महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2870120-21 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/87/2025-26 **दिनांक** :-14/01/2026

# -:परिपत्रक:-

**विषय:- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (संयुक्त गट ब व क) परीक्षा पुर्व प्रशिक्षण 2025-26 करीता निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांची प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करणेबाबत.**

सन 2025-26 या आर्थिक वर्षात महाज्योती मार्फत राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग (संयुक्त गट ब व क) स्पर्धा परीक्षा पुर्व प्रशिक्षणाकरीता पात्र विद्यार्थ्यांची निवड यादी दि.15/12/2025 रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करुन निवड झालेल्या विद्यार्थ्यांना संबंधित प्रशिक्षण संस्थांमध्ये रुजू होण्याकरीता कळविण्यात आले होते. तथपि काही कारणास्तव निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी संबंधित प्रशिक्षण संस्थांमध्ये रुजू होऊ शकले नाही, अशा विद्यार्थ्यांना दि.10/01/2026 रोजी पर्यंत प्रशिक्षण संस्थेत रुजू होण्याकरीता मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु अद्याप सदर प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या काही विद्यार्थ्यांनी रुजू प्रक्रिया पुर्ण केलेली नाही.

त्यामुळे रिक्त असलेल्या जागांकरीता चाळणी परीक्षेतील प्राप्त गुणांकनानुसार प्रवर्गनिहाय व समांतर आरक्षणानुसार पात्र विद्यार्थ्यांची प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात येत असुन निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी दि.20/01/2026 रोजी पर्यंत संबंधित प्रशिक्षण संस्थेत रुजू प्रक्रिया पुर्ण करावयाची आहे, याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच ज्या विद्यार्थ्यांची निवड रद्द करुन प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे, अशा विद्यार्थ्यांची यादी देखील सदर परिपत्रकासंह प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**नोट:- प्रशिक्षण संस्थेबाबत आवश्यक माहितीकरीता दि.15/12/2025 रोजी सदर प्रशिक्षणाकरीताच्या निवड यादीसंह प्रसिद्ध करण्यात आलेल्या परिपत्रकाचे अवलोकन करण्यात यावे.**

(स्वा.)
(मिलिंद नारिंगे)
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर